## आठवण आठवणींची.....

आठवणींचे रंग......

दाट-गडद ढगाळ्लेले
आतून-बाहेरुन भिजलेले
हास्यांनी तरारलेले,
कधी अश्रूंमध्ये बुडलेले !

आठवणींची वाट......

बऱ्याच वळणा-वळणांची
सुखद-दुःखद क्षणांची,
मुक्कामी पोहोचण्याची,
तर कधी भरकटत जाण्याची !

आठवणींची साथ.......

सतत सोबत येणारी
जन्मोजन्मी पुरणारी
हळूच जवळ आणणारी....
तुला-मला जोडणारी !!!

**- प्रीती देशपांडे**
**www.meetpreeti.com**